# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२८/०४/२०१९
## दि.२७/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३७३/१९,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | सुशिलकुमार सिंग, वय ३४ वर्षे,रा.कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | १)विशाल गोविंद वार,वय २७ वर्षे,रा.स.न.२४,स्वामी सर्मथनगर,स्वामी मठाजवळ, आंबेगाव पठार, पुणे २)उमेश महादेव कानकुडे, वय २१ वर्षे,रा. स.न.१६ लेन.२,मलहार अर्पा. समोर साई सिध्दी चौक, आंबेगाव पठार,पुणे ३)अक्षय प्रकाश पालकर, वय २१ वर्षे, रा. स.न.२०/१ शिव प्रताप कॉंलनी, घर न. ३८, आंबेगाव पठार, पुणे ( अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०४/२०१९ रोजी १९/३० वा.चे सुमारास येवलेवाडी कमानीच्या शेजारी, कोंढवा,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे पान शॉप मध्ये पान खाण्यासाठी पायी जात असताना, कमानीच्या शेजारी उभी असलेली एक काळया रंगाची ॲटो रिक्षामधील मागे बसलेल्या यातील नमुद इसमा पैकी एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांचा डावा हात ओढुन, त्यांना हातातील कड्याने तोंडावर मारुन जखमी करुन, त्यांच्या गळयातील एक सोन्याची चैन ३५ हजार रु. किंमतीची जबरदस्तीने चोरुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. मोरे ९८७०३२७७०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे १८२/१९,भादविक ३०४, ३२३,३४ |
| **फिर्यादी** | आप्पासाहेब गणपती मोरे, सहा.पो.निरी.चंदननगर पो.स्टे.पणे शहर |
| **आरोपी** | १)राजेश ईश्वर जाधव, वय ४५ वर्षे, रा.भैरवनाथ मंदिराजवळ, खराडी गावठाण, पुणे २)रमेश बालाजी बक्के, वय २९ वर्षे, रा. सदर ३)बाबुराव कानीराम राठोड, वय ४० वर्षे, रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०४/१९ रोजी पहाटे ०४/३० वा.चे सुमारास तसेच सकाळी ०५/१५ ते ०५/४० वा.चे दरम्यान खराडी गावठाण, पुणे तसेच शितलाई देवी मंदिराच्या जवळ, नाल्याचे जवळील सिमेंटच्या रोडवर, खराडी गावठाण, पुणे येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळीव ठिकाणी, यातील मयत इसम-अर्जुन लामीछाने, वय ३५ वर्षे, रा. गाव चिसपाणी, ग्रामपंचायत बिनय त्रिवेणी, सरदी दुमकीबास, जि.नवलपुर, राज्य लुमिनी, देश नेपाळ याने साक्षीदार एक महिला यांच्या घराचा दरवाजा वाजवुन पाणी मागुन त्यांना त्रास दिला याबाबत राजु जाधव याने सदरच्या इसमास विचारपुस केली असता सदर इसमाने राजु जाधव यास हाताने मारहाण करुन दगड मारला तसेच बाबुराव राठोड याची पत्नी हिचा मयत अर्जुन याने हात पकडला या कारणाचा राग धरुन, सदर इसमास सकाळी ०५.१५ ते ०५.४० वा.चे दरम्यान शितलाई देवी मंदीराच्या जवळ, नाल्याच्या जवळील सिमेंट रोडवर, खराडी गावठाण, खराडी, पुणे येथे मयत इसम अर्जुन लामीछाने, यास राजु जाधव याने धुणे धुण्याचे लाकडी बॅटने, पोपट बक्के याने लाकडी दांडक्याने व बाबुराव राठोड याने लाथेने त्यास मारहाण केली. त्या कृतीमुळे मृत्यु होईल याची त्यांना जाणीव असुन पण मृत्यु घडवून आणण्याचा किंवा मृत्युस कारण होण्याचा संभव आहे अशी शारीरीक क्षती घडवुन आणण्याचा उद्देश नसताना ती कृती केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. वराळ ९५०३५३४००२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ३६४/१९,भादविक ३०६,३४ |
| **फिर्यादी** | किरण घुले,वय २० वर्षे,रा.मांजरी ब्रुा, ता.हवेली, जि.पुणे |
| **आरोपी** | १)इम्तीयाज खान,वय ३८ वर्षे, २)जावेद शेख,वय ३५ वर्षे, ३)आरबाज शेख,वय ३६ वर्षे, |

| | |
|---|---|
| | ४)तौसिफ शेख,वय ३९ वर्षे ५)शंकर चोरघडे,वय ४० वर्षे, ६)हितेश शेळके,वय ३८ वर्षे,सर्व रा.एस कुदळे कार शोरुम, पुणे-सोलापुर रोड, मांजरी ब्रुा, ता.हवेली, जि.पुणे यांचे कामगार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | गेले एक महिन्यांपासुन ते दिनांक २७/०४/१९ रोजीचे दरम्यान एस कुदळे कार शोरुम, पुणे-सोलापुर रोड, मांजरी ब्रुा, ता.हवेली, जि.पुणे व साडेसतरानळी रेल्वेगेट, हडपसर, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता. वेळी एस कुदळे कार शोरुम पुणे-सोलापुर रोड मांजरी ब्रुा, पुणे येथे फिर्यादी यांचा भाऊ सुरज प्रल्हाद घुले,वय २२ वर्षे,रा.कुंजीर वस्ती मांजरी ब्रुा, ता.हवेली,जि पुणे हा काम करीत असताना त्यास मागील एक महिने पासुन तेथील काम करणारे इसम नामे-इम्तीयाज खान,जावेद शेख,आरबाज शेख,तौसिफ शेख,शंकर चोरघडे व हितेश शेळके यांनी वेळोवेळी त्याचा मानसिक छळ करुन, त्यास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. गाडे ८८८८८७९९६९ |

**४**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे १६५/१९,भादविक ३०६,३२३ |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ६० वर्षे,रा.मैचिचोळी पोस्ट बबलाद, ता.अक्कलकोट, जि.सोलापुर |
| **आरोपी** | गंगाराम गायकवाड,वय ३५ वर्षे, रा.सर्वत्र विहार कॉलनी,खडकी, पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०१/२०१९ रोजी १५/३० वा.चे सुमारास कि.मी.नं.१८६/३४.३६ च्या मध्ये कोणत्यातरी धावत्या रेल्वेगाडी खाली |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी नामे साविञा गंगाराम गायकवाड,वय ३२ वर्षे, रा.सर्वञ विहार कॉलनी खडकी पुणे हिने तिचे पती गंगाराम गायकवाड,याने वेळावेळी पैशाची मागणी करून, सतत अपमाण करून,तिला दिलेल्या ञासामुळे जिवास कंटाळून तिने कोणत्यातरी धावत्या रेल्वे गाडी खाली आत्माहत्त्या केली आहे.( सदरचा गुन्हा हा पुणे रेल्वे लोहमार्ग कडून ०० नंबरने खडकी पोलीस स्टेशनला वर्ग करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. शिंत्रे २५८१८६५९ |

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे ९७/१९,भादविक ४२०,४०६ |
| **फिर्यादी** | एक पुरुष, वय ५२ वर्षे, रा.मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपी** | एक महिला, वय ३५ वर्षे,रा.मार्केटयार्ड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २००६ पासुन ते दि.१४/०२/२०१९ रोजी दरम्यान अलआमिन सोसायटी, गुलटेकडी, मार्केटयार्ड,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले कालावधीमध्ये यातील नमुद महिला हिने फिर्यादी यांचेकडुन घेतलेले १४ लाख ५ हजार रु. टिसीएस मध्ये पैसे गुंतवते असे सांगुन फिर्यादी यांचेकडुन घेतलेले पैसे कंपनीत भरणा केले नाहीत. तसेच फिर्यादी यांनी सदर रक्कम परत मागितली असता ती देण्यास टाळाटाळ करुन फिर्यादी यांचेवर केस करण्याची धमकी देवुन, यातील नमुद महिलेने दिलेले सर्व धनादेश बँकेत बाऊन्स झाले असुन, यातील नमुद महिलेने नमुद रक्कमेची फसवणुक करुन सरद रक्कमेचा अपहार केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. एस.व्ही.देवधर ९८७०८६३३०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**